# अल्पसंख्यांक हक्क संघर्ष समिती

## पहिली महाराष्ट्र राज्य परिषद

## सोलापूर : बुधवार, दि. ८ जानेवारी २०१४

भारतात धार्मिकदृष्ट्या मुस्लिम हा सर्वात मोठा अल्पसंख्यांक समूह असून देशात १४ टक्के तर महाराष्ट्रात ११.४ टक्के इतके त्याचे प्रमाण आहे. हे मुस्लिम या देशाच्या मिलीजुली किंवा गंगाजमनी संस्कृतीचे वाहक आहेत. भारतीय राज्यघटनेने या देशातील सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य आणि दर्जाची व संधीची समानता प्रदान केलेली आहे. कोणत्याही देशातील लोकशाही व्यवस्थेचे मुल्यांकन त्या देशातील जातीय, धार्मिक, प्रादेशिक, भाषिक, वांशिक दृष्ट्या अल्पसंख्यांकांची परिस्थिती कशी आहे, यावरच होत असते. या देशातील राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता बळकट करण्यासाठी सर्व प्रकारच्या अल्पसंख्यांकांना समान हक्क आणि अधिकार दिले पाहिजेत.

गोपाल सिंग कमिटी, न्या. राजेंदर सच्चर समिती, न्या. रंगनाथ मिश्रा कमिशन किंवा वेळोवेळी केलेले विविध पाहणी अहवाल मुसलमानांच्या विदारक अवस्थेवर प्रकाश टाकतात. स्वातंत्र्योत्तर कालखंडात शिक्षण, रोजगार, उत्पन्न इ. सर्वच क्षेत्रांमध्ये मुस्लिमांची पिछेहाट झालेली दिसते. एवढेच नव्हे तर काही बाबतीत मुसलमानांची अवस्था दलित आणि आदिवासींपेक्षाही निम्न दर्जाची दिसून येते.

मुस्लिमांना भेडसावणारे प्रश्न मुख्यत: अस्मिता, सुरक्षा आणि समानता यांच्याशी संबंधित आहेत. आज मुस्लिम आणि देशद्रोही हे दोन्ही शब्द जवळपास समान अर्थाने वापरले जाऊ लागले आहेत असे दिसते. किंबहुना काही समाजघटकांकडून किंवा काही प्रसारमाध्यमांकडूनच नव्हे तर शासकीय घटकांकडून देखील मुस्लिमांकडे सतत संशयग्रस्त नजरेने पाहिले जाते हे वास्तव आहे. त्याचबरोबर सार्वजनिक ठिकाणी बुरखा, टोपी, दाढी ही सांस्कृतिक चिन्हे टिंगल टवाळीचा विषय बनलेली दिसतात. त्याला घर भाड्याने अथवा विकत घेण्यात अडचणी येतात. मुलांना शाळेत प्रवेश मिळणे कठीण असते आणि तेथे भेदभावपूर्ण वागणुकीला तोंड द्यावे लागते.

मुस्लिमविरोधी दंगलीमुळे त्यांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. शासन दंगलखोरांना शिक्षा करताना दिसत नाही. मुस्लिमांशी पोलिसांचा व्यवहार नेहमीच पक्षपातपूर्ण राहिलेला दिसून येतो. दंगलीत मुस्लिमच मोठ्या प्रमाणावर बळी पडतात पण त्याचबरोबर पोलिसांच्या गोळीबारात आणि अटकसत्रातही मोठ्या संख्येने मुस्लिमच असतात. या सर्वामुळे आपण या देशाचे दुय्यम नागरिक आहोत अशी भावना मुस्लिमांमध्ये मोठ्या प्रमाणावर निर्माण होत आहे. या भावनेचे निराकरण करण्यासाठी तसेच महाराष्ट्रातील मुस्लिमांचा विकास हा केवळ मुस्लिमांचाच प्रश्न आहे असा विचार न करता तो संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासाचा प्रश्न आहे, हे वास्तव लक्षात घेऊन खालील मागण्या आम्ही करीत आहोत :-

१) शासन ज्याप्रमाणे दलित व आदिवासींच्या विकासासाठी अर्थसंकल्पात विशिष्ट रक्कम राखून ठेवते त्याप्रमाणे मुस्लिमांसाठीही लोकसंख्येच्या प्रमाणात देशाच्या आणि राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी.

२) अल्पसंख्यांकांसाठी आज लागू असलेल्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी काटेकोरपणे व्हावी यासाठी सक्षम यंत्रणा उभी करावी. मौलाना आझाद महामंडळ, राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास आणि निधी महामंडळ, वक्फ कौन्सिल

इ. संस्थांना जादा आर्थिक तरतूद करून त्यांच्या योजनांचा विस्तार करावा.

३) वक्फच्या मालमत्तेचे संरक्षण करून त्या मालमत्तेचा वापर मुस्लिम समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी करण्यात यावा.

४) मुस्लिम बहुसंख्य असलेल्या गावांत किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वार्डमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र आणि एकात्मिक बालविकास योजना राबविण्यात यावी.

५) मुस्लिम समाजातील गरिबांसाठी घरकुले उभारली जावीत.

६) मुस्लिम अल्पसंख्यांकांची वास्तव माहिती दर दहा वर्षांनी शासनाने प्रकाशित करावी, ज्यायोगे मुस्लिमांची सत्य परिस्थिती कळू शकेल.

७) मुस्लिम समाजाला आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रक्रियेत सामावून घेतले जात नाही, त्या बाबतीत त्यांच्याशी भेदभाव केला जातो अशी मुस्लिम समाजाची भावना आहे. त्यासंदर्भात न्या. सच्चर समितीने समान संधी आयोग स्थापन करावा अशी शिफारस केली होती. तरी केंद्र तसेच राज्य पातळीवर समान संधी आयोग स्थापन करावा.

८) मुस्लिमांच्या मागासलेपणाचा अभ्यास सर्वांगीण स्वरूपात व्हावा, त्याचबरोबर मागासलेपणा समाप्त करण्यासाठी पर्यायी विकास आराखडा तयार करावा. यामध्ये मुस्लिमांसाठी नोकरी, स्वयंरोजगार, व्यापार यामध्ये काणत्या जागा/संधी उपलब्ध होऊ शकतात याचा शोध घ्यावा. तसेच यामध्ये शेती, पशुउद्योग, मत्स्यपालन, औद्योगिक आस्थापना, बांधकाम क्षेत्र, माहिती तंत्रज्ञान क्षेत्र, सेवा क्षेत्र इ.चा समावेश असावा.

९) शेतीक्षेत्रातील मुस्लिमांचे सरासरी दरडोई उत्पन्न, दरडोई जमीन तसेच १९६०-६१ ते २०१०-११ या कालावधीत मुस्लिमांचे जमीन मालकीचे प्रमाण कसकसे बदलत गेले हे अभ्यासले जावे. महाराष्ट्रातील इनाम वर्ग १ ते ७ प्रकारच्या एकूण जमिनीमध्ये मुस्लिमांचे प्रमाण अभ्यासले जावे. तसेच शेती उपयोगी पाणी वापरावर किती टक्के मुस्लिमांचा अधिकार आहे हे पाहिले जावे.

१०) १९६०-६१ ते २०१०-११ या कालखंडात महाराष्ट्रात वरकड/गायरान पडजमीन किती प्रमाणात वाटण्यात आली याची चौकशी करून त्यामध्ये मुस्लिमांचे प्रमाण कमी असल्यास तातडीने सुधारणा करण्यात यावी.

११) सिंचन, वीज, हायब्रिड बी-बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके यांच्यासाठी सबसिडी, शेतकऱ्यांसाठी राबविण्यात आलेल्या विविध योजना, त्यांचा मुस्लिमांना झालेला फायदा अभ्यासला जावा. महाराष्ट्रातील सहकारी उद्योग, त्यामध्ये झालेले कर्जवाटप, नोकऱ्या, उत्पादन इ.मध्ये मुस्लिमांचे प्रमाण अभ्यासले जावे. मुस्लिमांना त्यांचा रास्त वाटा मिळावा यासाठी उपाययोजना कराव्यात.

१२) एम.आय.डी.सी. त्याचबरोबर संघटित/असंघटित उद्योग इत्यादींमध्ये मुस्लिम उद्योजक व मुस्लिम कामगार यांचे प्रमाण तसेच कापडउद्योग आणि पारंपारिक उद्योग व्यवसायात काम करणाऱ्या मुस्लिमांचे प्रमाण, बँका, विविध वित्तीय संस्थांमधून मुस्लिम व इतरांना झालेला कर्जपुरवठा/दिलेल्या सवलती अभ्यासल्या जाव्यात. त्यामध्ये मुस्लिमांचा अनुशेष असेल तर तो भरला जावा.

१३) हिंदू धर्माव्यतिरिक्त बौद्ध व शीख धर्मातील एस.सी./एस.टी. साठी राखीव जागा आहेत. तशाच स्वरूपाच्या मुस्लिम व ख्रिश्चन धर्मातील एस.सी. व एस.टी. करीता राखीव जागा ठेवण्यात याव्यात. त्यासाठी कायदा केला जावा. जात प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया साधी सुलभ करावी.

१४) केवळ संशयावरून अनेक निरपराध मुस्लिमांना वर्षांनुवर्षे जेलमध्ये सडत ठेवले जाते. उदा. मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील खरे आरोपी सापडले तरी केवळ संशयावरून अटक केलेल्या अनेक मुस्लिमांची अनेक वर्षांनंतर सुटका केली

गेली. अशांची तातडीने सुटका करण्यात यावी. केवळ संशयावरून अटक केलेल्यांचा दर तीन महिन्यांनी आढावा घेण्यात यावा. निरपराधांची सुटका करण्यात यावी. तसेच ज्या पोलीस/मुलकी अधिकाऱ्यांनी मुस्लिमांना विनाकारण त्रास दिला त्यांच्यावरही कडक कारवाई करण्यात यावी. त्यासाठी सध्याची यंत्रणा अपुरी आहे हे वास्तव लक्षात घेऊन स्वतंत्र यंत्रणा उभी करण्यात यावी.

१५) राज्य तसेच केंद्रीय सुरक्षा दलात तसेच विविध शासकीय व निमशासकीय निवड समित्यांवर मुस्लिमांना पुरेसे आणि योग्य ते प्रतिनिधित्व मिळावे.

१६) जातीय दंगलीमध्ये सहभागी असणाऱ्यांना तातडीने शिक्षा देण्यासाठी जलदगती न्यायालयांची स्थापना करण्यात यावी. गुजरात नरसंहारासहित इतर ठिकाणी बळी पडलेल्या व्यक्तींसाठी १९८४च्या धर्तीवर पुरेशी नुकसानभरपाई मिळाली पाहिजे.

१७) जातीय हिंसाचार प्रतिबंधक विधेयक संमत करण्यात यावे.

१८) मुस्लिम ओबीसींना ओबीसी कोट्यातून लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य वाटा मिळाला पाहिजे. तसेच मुस्लिम ओबीसींना जातीचे दाखले देण्याबाबत सरकारी अधिकाऱ्यांची अनास्था लक्षात घेता त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारली पाहिजे.

१९) महाराष्ट्रात वक्फच्या जमिनीवर सरकारी आणि बिगर सरकारी अतिक्रमणे फार मोठ्या प्रमाणावर आहेत. ती अतिक्रमणे हटवून त्या जमिनीचा वापर मुस्लिम समाजाच्या विकासासाठी व्हावा असे प्रयत्न केले पाहिजेत. वक्फ बोर्डामध्ये इस्लामी धर्मशास्त्र आणि कायदे याबाबत माहिती असणारे सरकारी अधिकारी नेमले जावेत.

२०) न्या. सच्चर समितीने सुचविल्याप्रमाणे महाराष्ट्रात अलिगड मुस्लिम विद्यापीठाची शाखा स्थापन करावी.

२१) ज्या गावात आणि विभागात मुस्लिम मोठ्या संख्येने राहतात अशा ठिकाणी मुलामुलींसाठी आधुनिक शिक्षण देणाऱ्या शाळा निर्माण केल्या पाहिजेत. त्यात निवासी शाळा तसेच मुलींसाठी खास वसतिगृहे उभारली पाहिजेत. त्याच बरोबर शाळांमध्ये उर्दू विषयाच्या जागा भरण्यासाठी उर्दू भाषिक शिक्षकांची नेमणूक केली जावी.

२२) न्या. श्रीकृष्ण आयोगाने (मुंबई दंगल) ज्या राजकीय नेत्यांना, पोलीस आणि शासकीय अधिकाऱ्यांना दोषी ठरविले आहे, त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी. त्याचबरोबर न्या. शेट्टी आयोगाचा (सोलापूर दंगल) अहवाल जाहीर करण्यात येऊन दोषींना कठोर शिक्षा देण्यात यावी.

२३) धुळे व मुजफ्फरनगर दंगलीतील बळी पडलेल्या सर्वांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्यात यावे. तसेच दंगलीला प्रोत्साहन देणाऱ्या राजकीय नेत्यांवर आणि दंगलखोरांकडे दुर्लक्ष करणाऱ्या पोलीस आणि मुलकी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी.

२४) मुस्लिम समाजातील लोक कारागीर आहेत. या कारागिरांत मुस्लिम महिलांचे प्रमाण जास्त आहे. अशांना सहज कर्जपुरवठा उपलब्ध झाला पाहिजे. पंतप्रधानांनी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना एकूण कर्जाच्या १५ टक्के कर्जे अल्पसंख्याकांना देण्याची घोषणा केली आहे. या निर्णयाची कडक अंमलबजावणी झाली पाहिजे.

२५) मिळकत व गुणवत्ता या दोन्हींच्या आधारावर स्टायपेंड व स्कॉलरशिप यात वाढ झाली पाहिजे. तसेच मदरशांमधून व्यवसायाभिमुख शिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. मुस्लिम बहुसंख्य विभागात व्यवसाय प्रशिक्षण संस्था, पॉलिटेक्निक आणि इतर व्यवसायाभिमुख महाविद्यालये उघडली पाहिजेत.

# स्वातंत्र्योत्तर काळातील मुस्लिम राजकारण

प्रा. डॉ. महेबूब सय्यद

स्वातंत्र्योत्तर कालखंडात फाळणीचे तथाकथित पाप डोक्यावर घेऊन मुस्लिम समाजमन वावरू लागले. सर्वसामान्य मुसलमानांचा फाळणीशी कोणत्याही प्रकारे संबंध नव्हता. कारण मतदानाचा अधिकार अत्यंत मर्यादित होता. एकूण मुस्लिम लोकसंख्येच्या अवघ्या १५ टक्के मुस्लिमांना मतदानाचा अधिकार होता. त्यापैकी केवळ ११ टक्के मुस्लिमांनी मुस्लिम लीगला मतदान केले. हे मतही मुस्लिम समाजातील उच्चजातवर्गीय मुस्लिमांचे मत होते. पण हे मत संपूर्ण मुसलमान समाजावर थोपविले गेले आणि या निर्णयाला संपूर्ण मुस्लिम समाजाचा पाठिंबा आहे, असे भासविले गेले. वास्तविक पाहता मुस्लिम लोकसंख्येच्या ९० टक्के मुस्लिमांची पाकिस्तानच्या निर्मितीमध्ये कोणतीही भूमिका नव्हती. एवढेच नव्हे तर मुस्लिम बहुसंख्यांक काश्मीरमध्ये शेख अब्दुल्ला यांच्या नेतृत्वाखाली जी चळवळ चालू होती, त्या चळवळीने मुस्लिम कॉन्फरन्स हे नाव बदलून नॅशनल कॉन्फरन्स हे नाव धारण केले होते. त्याचबरोबर काश्मीरमधील मुस्लिम बहुसंख्याकांनी आपले नाते धर्मांध पाकिस्तानशी न जोडता धर्मनिरपेक्ष भारताशी जोडले हा इतिहास आहे. पण हा इतिहास नजरेआड करून मुस्लिमांना फाळणीचे गुन्हेगार म्हणून संबोधले जाते. परिणामी एक प्रकारच्या दुय्यम दर्जाला त्यांना सामोरे जावे लागते.

वास्तविक पाहता स्वातंत्र्यपूर्व कालखंडातही मुस्लिम लीग संपूर्ण भारतीय मुसलमानांचे प्रतिनिधित्व कधीही करत नव्हती. त्याही काळात जमाते उलेमा हिंद, ऑल इंडिया मुस्लिम मजलिस, वायव्य सरहद्द प्रांतात बादशहा खानांच्या नेतृत्वाखालील खुदाई खिदमतगार, शिक्षा पोलिटिकल कॉन्फरन्स, मजलीस ए इस्लाम, ऑल इंडिया मोमीन कॉन्फरन्स, कृषक प्रजा पार्टी, अंजुमन ए वतन इत्यादी विविध स्वरूपाच्या संघटना आणि पक्ष मुस्लिमांमध्ये कार्यरत होते. हे सर्वच पक्ष आणि संघटना मुस्लिम लीग आणि द्विराष्ट्रवादाच्या विरोधात होते. पण असे असताना सुद्धा हा गैरसमज कायम राहिला की, मुस्लिम लीग संपूर्ण भारतीय मुसलमानांचे प्रतिनिधित्व करते. याचा दुसरा अर्थ असाही केला गेला की, भारताच्या फाळणीला संपूर्ण मुस्लिम समाजाची मान्यता आहे. अशा पद्धतीच्या समजामुळे भारतीय मुसलमानांचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले. ते कायमच बचावात्मक पवित्र्यात राहिले. या सर्वांचा परिणाम मुस्लिमांच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय इ. सर्वच प्रकारच्या समाजजीवनावर झाला.

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मुस्लिमांचा विचार करत असताना सर्व मुस्लिम एक आहेत असे मानले जाते. वस्तुत: भारतीय मुस्लिम समाजातील इस्लामची धार्मिक पाळेमुळे ही अरबस्तानात असली तरी त्याची सांस्कृतिक पाळेमुळे भारतीय मातीशीच इमान राखून आहेत. कारण मुस्लिम काही परकीय देशांतून इथे स्थायिक झालेले नाहीत. तर ते इथलेच आहेत. फक्त त्यांचे धर्मांतर झालेले आहे. त्यांचे धर्मांतर झाले पण जातिनिर्मूलन झाले नाही. कारण त्यांची उत्पादनाची साधने जाती आधारितच राहिली. त्यात काहीच फेरबदल झाले नाहीत. त्यांचा व्यवसाय आणि त्या व्यवसायाशी जखडली गेलेली जात तीच राहिली. उदा. हिंदू असताना तो माळी किंवा कोष्टी होता, तर मुस्लिम झाल्यानंतर तो बागवान किंवा अन्सारी/जुलाह बनला. त्याची उपासना पद्धती बदलली पण जीवन पद्धती मात्र बदलली नाही आणि बदलणे देखील शक्य नव्हते. कारण जोपर्यंत उत्पादन साधने आणि उत्पादन संबंध यामध्ये क्रांतिकारी फेरबदल घडत नाही तोपर्यंत मानवी जीवन पद्धती बदलत नसते, हे वास्तव आहे. तात्पर्य मुस्लिमांची अखिल भारतीय पातळीवर एकच एक एकात्म प्रतिमा मानणे गैर आहे. भारतीय मुस्लिम हा जात, वर्ग, प्रदेश, भाषा, वंश इत्यादींमध्ये इतरांसारखाच विभाजित आहे. त्यामुळे संपूर्ण देशातील मुस्लिम एकाच पद्धतीने विचार करतात ही मांडणी वास्तवाला धरून नाही.

मात्र असे असले तरी मुस्लिम कशा पद्धतीने विचार करतात, त्या विचारांची दिशा काय राहिली हे समजावून घेणे अत्यावश्यक आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मुस्लिमांच्या विचार आणि व्यवहाराची आपण चार कालखंडात विभागणी

करू शकतो. १९४७ ते १९७७ हा पहिला कालखंड, १९७७ ते १९९२ हा दुसरा कालखंड, १९९२ ते २००२ हा तिसरा कालखंड आणि २००२ नंतरचा चौथा कालखंड होय.

स्वातंत्र्य आणि फाळणीनंतरच्या कालखंडात जातीय दंगली आणि द्वेषाच्या वातावरणामुळे मुस्लिम समाज अक्षरश: हतबल आणि विमनस्क अवस्थेत होता. ज्या मुस्लिमांना फाळणीनंतरही भारतातच राहावयाचे होते, ज्यांची संख्या कोट्यवधींच्या घरात होती, त्यांच्या वाट्याला अपमान, अवहेलना आणि कुचेष्टा आली होती. अशा पार्श्वभूमीवर मुस्लिम नेत्यांना हिंसा आणि द्वेष संपविणे आवश्यक वाटले. मौलाना आझाद आणि पंडित नेहरू यांच्यामुळे मुसलमान सावरले. याच काळात मौलाना आझाद यांनी मुसलमानांनी केवळ मुस्लिमांसाठीचा वेगळा पक्ष काढू नये असा सल्ला दिला. हा सल्ला त्या काळात आणि नंतरही मानला गेला. त्यामुळे केवळ मुस्लिमांसाठी कोणताही पक्ष मुस्लिमांनी काढला नाही. तसेच मुस्लिम लीग आणि हैद्राबादची ऑल इंडिया इत्तेहादूल मुस्लिम यांची वाढ होऊ शकली नाही. त्यांचा विकासच खुंटला. त्याचबरोबर मुस्लिम इतरांसारखेच वेगवेगळ्या राजकीय पक्षांत विखुरले गेले.

१९४७ पासून जे मुस्लिम नेतृत्व होते, ते ब्रिटिश साम्राज्यशाहीविरोधी लढ्यातून निर्माण झालेले होते. मौलाना आझाद, रफी अहमद किदवाई, डॉ. सय्यद मेहमूद, अब्दुल कय्यम अन्सारी इत्यादींना स्वातंत्र्यलढ्याचा वारसा होता. हे सर्वच जण अत्यंत लोकप्रिय आणि प्रभावशाली होते. त्यामुळे त्यांना कोणत्याही वेगळ्या आधाराची गरज नव्हती. मात्र असे असले तरी पंडित नेहरू आणि तत्कालीन काँग्रेस नेतृत्वाने मौलाना आझाद यांना निवडणुका लढविण्यासाठी मुस्लिम बहुसंख्यांक असलेल्या रामपूरमध्येच पाठविले. १९५७च्या निवडणुकीत मौलाना आझाद मेवातमधून निवडणुकीसाठी उभे राहिले. येथेही मुस्लिमांची संख्या लक्षणीय आहे. भांडवली लोकशाहीत निवडणुकीवर प्रभाव टाकणारा हा धर्माचा प्रभाव आहे. पुढे १९६२ नंतर उपरोक्त नेते काळाच्या पडद्याआड गेले.

याच काळात देशभर विशेषत: उत्तर भारतात सांप्रदायिक वातावरण तणावपूर्ण बनले होते. १९६१- जबलपूर, १९६४ - राऊरकेला, १९६५-६६ - उदयपूर, १९६७ - रांची, हटिया, १९६९ - तेल्लिचेरी, अहमदाबाद, बडोदा, खेडा, अमरेली, मेहसाना, १९७० - भिवंडी, जळगाव, महाड, इ. ठिकाणी झालेल्या एकतर्फी मुस्लिमविरोधी दंगलींनी मुस्लिमांना मुळापासून हलवून सोडले. काँग्रेससोबत राहून आपले जीवित आणि वित्त सुरक्षित राहू शकत नाही ही भावना मुस्लिमांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढीस लागली. १९६४ मध्ये पहिल्यांदा ऑल इंडिया मजलीस मुशावरत स्थापन झाली. डॉ. फरीदी यांनी गैरकाँग्रेसी भूमिका घेऊन एक संघटना उभारण्याचा प्रयत्न केला. पण हा प्रयत्न फारसा यशस्वी होऊ शकला नाही. यानंतर १९६७च्या निवडणुकीत काँग्रेसची अवस्था दयनीय झाली. याच काळात इंदिरा गांधी आणि तत्कालीन नेतृत्वाने तथाकथित मुस्लिम अनुनयाला सुरुवात केली.

१९७७च्या दरम्यान दिल्लीच्या जामा मशिदीचे इमाम अब्दुल्ला बुखारी राजकारणात ओढले गेले. उत्तर भारतात काँग्रेसला पराभूत करण्यामध्ये मुस्लिमांनी मोठी भूमिका बजावली. हे लक्षात घेऊन १९८०च्या निवडणुकीत इंदिरा गांधी दिल्लीच्या जामा मशिदीत गेल्या. त्यानंतर इमाम अब्दुल्ला बुखारींकडे जाणाऱ्या राजकीय नेत्यांची रांगच लागली. त्यामध्ये बाबू जगजीवनराम, हेमवती नंदन बहुगुणा, चंद्रशेखर, मोराराजी देसाई, जॉर्ज फर्नांडिस, व्ही. पी. सिंग इत्यादी अनेकांचा समावेश होता. एवढेच नव्हे तर भाजप नेते अटलबिहारी वाजपेयी यांनीही इमाम बुखारी यांचा पाठिंबा मागितला होता. चांदणी चौकातून निवडणूक लढविणारे जनसंघाचे उमेदवार सिकंदर बख्त यांनीही इमाम बुखारी यांचा पाठिंबा आणि आशीर्वाद घेतले होते. तात्पर्य ज्या ज्या वेळी इमाम बुखारी यांची आवश्यकता वाटली त्या त्या वेळी बहुतेक राजकीय पक्षांनी त्यांचा पाठिंबा आणि मदत घेतल्याचे दिसून येते. वास्तविक पाहता १९७५ पूर्वी इमाम बुखारी देशात तर सोडा पण उत्तर प्रदेशातसुद्धा कुणाला फारसे परिचित नव्हते. त्यांना सामाजिक प्रतिष्ठा आणि मुसलमानांचे नेते म्हणून अधिमान्यता देण्यास काँग्रेससह सर्वच भांडवली राजकीय पक्ष जबाबदार आहेत.

१९८०च्या निवडणुकीत आजपर्यंतच्या लोकसभा निवडणुकीत सर्वात जास्त म्हणजे ३७ मुस्लिम खासदार निवडून आले होते. अब्दुल गफूर किंवा बॅ. अब्दुल रहेमान अंतुलेसारखे काही मुख्यमंत्री झालेले दिसतात. हा काळ भाजपच्या

दीनदयाळ उपाध्याय यांच्या एकात्म मानवतावादाचा व पुढे अटलबिहारी वाजपेयींच्या गांधीवादी समाजवादाचा होता. ३१ ऑक्टोबर १९८४ला इंदिरा गाधींची हत्या झाली. नंतरच्या निवडणुकीत राजीव गांधींना अभूतपूर्व बहुमत मिळाले. या सर्व काळात मुस्लिम अभिजन अलअक्सा मशिदीचा प्रश्न, कलम ३७०, हजरतबल दर्गा, समान नागरी कायदा, गोहत्या बंदी कायदा, उर्दू भाषेचा प्रश्न इत्यादी भावनिक प्रश्नांभोवती घोटाळत होते.

१९८६ला शहाबानो प्रकरण घडले. सुरुवातीला काँग्रेसने अरिफ मोहम्मद खान यांच्या नेतृत्वाखालील उदारमतवादी मुस्लिमांना पाठबळ दिले. पण याच काळात आसाममध्ये निवडणुका झाल्या व त्यामध्ये काँग्रेस पराभूत झाली. त्याचे खापर शहाबानो केसवर फोडण्यात आले. परिणामी झेड. आर. अन्सारी यांना पुढे करत शहाबानो केसचा निकाल फिरवण्यात आला. याची तीव्र प्रतिक्रिया बहुसंख्यांकांमध्ये उमटली. सरकार मुस्लिमांना घाबरते, त्यांचे लाड करते, त्यांचे लांगूलचालन करते इत्यादी स्वरूपाचा विखारी प्रचार सुरू झाला. बिथरलेले हिंदू जनमानस आपल्या विरोधात जाऊ नये म्हणून राजीव गांधींनी हिंदू जमातवाद्यांपुढे लोटांगण घालण्याची तयारी केली. गेली ३६ वर्षे न्यायालयात पडून असलेल्या अयोध्येच्या बाबरी मशिदीच्या संदर्भात १ फेब्रुवारी १९८६ रोजी न्यायालयाने कुलूप खोलण्याचा आदेश दिला. त्या निर्णयाचे अत्यंत दूरगामी परिणाम भारतीय राजकारणावर झाले.

आजपर्यंत लपून छपून आणि मागील दाराने वावरणारे धर्मांध शिवसेना-भाजप/संघ परिवारासारखे राजकीय पक्ष, संघटना उघडपणे वावरू लागले. महाराष्ट्रात १९८७ला विलेपार्ले विधानसभेच्या पोटनिवडणुकीत डॉ. रमेश प्रभू यांच्यासाठी शिवसेनेने उघडपणे हिंदुत्वाच्या नावावर मते मागितली आणि ते निवडूनही आले. पुढे ९ नोव्हेंबर १९८९ रोजी हिंदू मते मिळविण्यासाठी विश्व हिंदू परिषदेला शिलान्यासाला परवानगी देण्यात आली. दोन्ही समाजाच्या मूलतत्ववादी शक्तींना जणू मोकळे रानच मिळाले. गंगाजल रथयात्रा, रामजानकी रथयात्रा, रामशिला पूजन इत्यादी संघपरिवाराने आयोजित केलेल्या कार्यक्रमांमुळे केवळ उत्तर प्रदेशच नव्हे तर संपूर्ण देशभर सांप्रदायिक ध्रुवीकरण घडून आले. या धार्मिक उन्मादावर स्वार होत लालकृष्ण अडवाणींच्या नेतृत्वाखालील भाजप १९८४च्या २ जागांवरून १९८९ला ८६ पर्यंत पोहोचला.

१९७७च्या जनता पक्षासारखाच १९८९ला जनता दलाचा प्रयोग करण्यात आला. २२ नोव्हेंबर १९८९ ला निवडणुका झाल्या. विश्वनाथ प्रताप सिंहांचे सरकार भाजप आणि डावी आघाडी यांनी बाहेरून दिलेल्या पाठिंब्यावर सत्तारूढ झाले. या सर्व कालखंडात मुस्लिम समाज देशभरातल्या इतर समाजगटांसारखाच विचार आणि व्यवहार करत होता हे आपल्या लक्षात येईल. पुढे ६ डिसेंबर १९९२ला भारतीय संसद आणि सर्वोच्च न्यायालय यांना दिलेल्या आश्वासनाला हरताळ फासत आणि पी. व्ही. नरसिंहराव यांच्या छुप्या समर्थनामुळे संघ परिवाराने बाबरी मशीद जमीनदोस्त केली.

या घटनेचा मुस्लिम जनमानसावर प्रचंड परिणाम झाला. बाबरी मशीद पाडणे आणि देशभर उसळलेल्या मुस्लिमविरोधी दंग्यामुळे मुस्लिम मानस प्रक्षुब्ध होते. पण ते काहीच करू शकत नव्हते. कारण स्वत:ला धर्मनिरपेक्ष म्हणवून घेणारे अनेक पक्ष, त्यांचे नेते व स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते यांचा व्यवहार अत्यंत जातीयवादी स्वरूपाचा राहिला हे मुस्लिमांनी जवळून पाहिले. परिणामी १९९२ नंतर मुस्लिम हे भारतीय राजकारण/समाजकारण/अर्थकारण यामधून मोठ्या प्रमाणावर बाजूला फेकले गेले. १९९२ ते २००२ या कालखंडात मुस्लिम आपल्यावर झालेल्या अन्यायाच्या विरोधात दाद मागत होते. पण न्याय मिळत नाही हे पाहून छोट्या मोठ्या गुन्हेगारी घटना त्यातील काहीजण घडवत होते. १९९२-९३च्या भीषण मुंबई दंगलींनंतर त्यांची प्रतिक्रिया म्हणून लगेच मुंबईतील पहिले धक्कादायक बॉम्बस्फोट झाले.

१९९२-९३च्या शिवसेना-प्रणित मुंबई दंगलीनंतर नेमल्या गेलेल्या श्रीकृष्ण आयोगाने या सर्व बाबींवर प्रकाश टाकला आहे. पण श्रीकृष्ण आयोगाची अंमलबजावणी करू असे म्हणत सत्तेवर आलेल्या काँग्रेस-राष्ट्रवादीच्या सरकारने काहीही केले नाही हे वास्तव आहे. या सर्वांचा परिणाम मुस्लिमांवर झाला. प्रस्थापित राजकीय पक्षांकडून त्यांचा भ्रमनिरास झाला. ते लोकशाही प्रक्रियेपासून बाजूला फेकले जाऊ लागले. तत्पूर्वी ओ.बी.सी. चळवळ किंवा दलित-मुस्लिम सुरक्षा महासंघ (शब्बीर अन्सारी, हाजी मस्तान, प्रा.जोगेंद्र कवाडे इत्यादी) अशा पद्धतीने मुस्लिमांचा संसदीय प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न होता. पण हा प्रयत्न फारसा यशस्वी होऊ शकला नाही.

२००२ला गोध्राकांड आणि त्यानंतर गुजरातमध्ये नरेंद्र मोदी-प्रणित भाजप शासन पुरस्कृत मुस्लिमांचे भयानक हत्याकांड घडले. या घटनेचा मुस्लिम भावजीवनावर प्रचंड आघात झाला. वास्तविक पाहता धार्मिक दंगली आणि त्यामध्ये मुस्लिमांची जीवित आणि वित्त हानी मुस्लिमांना काही नवी नव्हती. पण २००२च्या गुजरातमधील शासन पुरस्कृत नरसंहाराने मुस्लिम मुळापासून उखडले गेले. कारण तत्पूर्वीच्या दंगलींमध्ये राज्यसंस्था मुस्लिमांच्या प्राणांचे आणि साधनसंपत्तीचे रक्षण करीत नव्हती ही गोष्ट खरी आहे. पण त्याचबरोबर ती हिंदूंनाही फारशी मदत करीत नसे. दंगलीमध्ये दोन्ही समूह समोरासमोर येऊन भिडत. त्यामध्ये मुस्लिमांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असे. पण पोलीस, सरकार तटस्थ असे.

२००२ नंतर मात्र शासनसंस्था मुस्लिमांवर हल्ले करण्यात पुढाकार घेऊ लागली. आता मुस्लिमांना केवळ हिंदू दंगलखोरांना तोंड द्यावे लागत नव्हते तर शासन सर्वप्रकारे त्यांच्यावर तुटून पडू लागले. परिणामी आपण लोकशाही पद्धतीने काही मिळवू शकतो हा विश्वासच मुस्लिम गमावून बसले. एवढेच नव्हे तर जे मुसलमानांचे मित्र मानले जात त्यांच्याही मनात झाले ते वाईट झाले, पण मुसलमानांना धडा शिकवायला हवा होता, अशी भावना निर्माण करण्यात संघ परिवार यशस्वी ठरला. या सर्व परिस्थितीत काही मुस्लिम तरुण मूलतत्ववादाच्या प्रभावाखाली येऊन दहशतवादाकडे वळले. पाकिस्तानच्या सत्ताधारीवर्गांनी त्यांना खतपाणी घातले. देशात विविध ठिकाणी झालेले बॉम्बस्फोट आणि २६ नोव्हेंबर २००८चा मुंबईवरील निषेधार्ह अतिरेकी हल्ला ही त्याची परिणती होती. हिंदुत्ववादी संघटनाही दहशतवादाकडे वळल्या, याची उदाहरणे मालेगाव, अजमेर शरीफ, मक्का मशीद आणि समझौता एक्सप्रेस या ठिकाणी झालेल्या बॉम्बस्फोटांतून समोर आली. त्याहीपूर्वी नांदेड, पूर्णा, जालना इत्यादी ठिकाणी हिंदुत्ववादी संघटनांनी बॉम्बस्फोट घडविण्याचे प्रयत्न केले होते. दहशतवादाला धर्म नसतो हे या सर्व घटनांवरून पुन्हा एकदा स्पष्ट झाले.

२००२च्या गुजरात येथील किंवा सप्टेंबर २०१३च्या मुजफ्फरनगरच्या दंगलपिडीत मुस्लिमांना तेथील सरकारांनी किंवा बहुतेक राजकीय पक्षांनी कोणत्याही स्वरूपाचे सहाय्य केले नाही. मदत छावण्या उभारल्या नाहीत. पूर, आग किंवा भूकंप यांसारख्या नैसर्गिक आपत्तींमध्ये पुढाकार घेणाऱ्या राज्य सरकारने एखादे मुस्लिम बहुल गाव/खेडे/शहर दत्तक घेतले नाही. कोणत्याही औद्योगिक घराण्याने या भीषण हत्याकांडानंतर पिडीतांसाठी मदत केंद्रे स्थापित केली नाहीत. ज्यांनी आपल्या सग्यासोयऱ्यांसोबत आपली आयुष्यभराची मिळकत गमावली त्यांच्या मदतीसाठी कुणीही पुढाकार घेतला नाही. जणू काही मुसलमान या देशाचे नागरिकच नाहीत अशा स्वरूपाचा विचार आणि व्यवहार या देशातील बहुतेक राजकीय/सामाजिक/सांस्कृतिक/धार्मिक पक्ष-संघटनांचा आणि राज्य व केंद्र सरकारांचा राहिला आहे. या सर्वांचे अत्यंत दूरगामी परिणाम केवळ मुस्लिमांवर नव्हे तर भारतीय जनमानसावर होणार आहेत.

अशा या सर्व परिस्थितीत धर्मनिरपेक्षतेचे तत्व केवळ डाव्या पक्षांनीच आपल्या व्यवहारातून खंबीरपणे उचलून धरले आहे. केरळ, पश्चिम बंगाल आणि त्रिपुरा येथील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील डाव्या आघाडीच्या सरकारांनी आपल्या सत्ताकाळात या राज्यांत एकही जातीय दंगल होऊ दिली नाही. अशाप्रकारे त्यांनी मुस्लिम, शिख, ख्रिश्चन अशा सर्वच अल्पसंख्यांक समाजाचे रक्षण केले. डाव्या सरकारांनी केलेल्या भूमिसुधारणा आणि जमिनीच्या फेरवाटपाचा लाभ लाखो मुस्लिम, दलित व आदिवासी कुटुंबांबरोबरच गरीब बहुजनसमाजाच्या कुटुंबांनाही मिळाला. शिक्षण आणि नोकऱ्यांत ओबीसी मुस्लिम आरक्षणाबाबतची न्या. रंगनाथ मिश्रा आयोगाची शिफारस पश्चिम बंगालच्या डाव्या आघाडीच्या सरकारने प्रथम अंमलात आणली. अर्थात अल्पसंख्यांक समाजाला विविध क्षेत्रांत न्याय देण्यासाठी अजून बरेच काही करणे बाकी आहे.

मौलाना आझाद यांनी स्वातंत्र्यानंतर भारतीय मुस्लिमांना स्वतंत्र पक्ष स्थापन करू नका असा संदेश दिला होता. हा संदेश नंतरच्या काळातील भारतीय मुस्लिमांनी इमाने इतबारे पाळला. पण प्रस्थापित पक्ष-संघटनांसोबत राहून आपण आपले रक्षण करू शकत नाही हे वास्तव त्यांच्यासमोर उभे राहात आहे. मुस्लिम जनमानस आज एका मुस्लिम राजकीय पक्षाच्या दिशेने निघालेले दिसते. म्हणूनच मुंबईचा अत्तराचा व्यापारी असलेला बद्रुद्दीन अकमल आसाममध्ये प्रचंड यश मिळवू शकतो, किंवा गेली अनेक वर्षे हैद्राबादमध्ये सीमित असलेली इत्तेहादूल मुस्लमिन नांदेड मनपामध्ये १७ नगरसेवक निवडून आणू शकते. एवढेच नव्हे तर जमाते इस्लामी हिंदने वेल्फेअर पार्टी ऑफ इंडिया या राजकीय पक्षाची स्थापना केली आहे. जमाते इस्लामीमध्ये

एकेकाळी नेतृत्वस्थानी असणारे मुस्ताफा फारूक आणि डॉ. कासिम रसूल इलियास हे वेल्फेअर पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष आणि सेक्रेटरी म्हणून काम पाहत आहेत. देशभरातील बारा राज्यांत या पक्षाच्या शाखा स्थापन झाल्या आहेत. या पक्षाद्वारे मुस्लिमांना संघटित करणे, त्याआधारे मुस्लिम सौदाशक्ती वाढविणे, त्याद्वारे राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर काही मागण्या मान्य करवून घेणे असे त्यांचे धोरण दिसते.

एकूण ५४५ लोकसभा मतदारसंघांपैकी ७२ लोकसभा मतदारसंघ असे आहेत की जेथे कोणाला निवडून द्यावयाचे हे मुस्लिम ठरवतात, तर १०२ लोकसभा मतदारसंघ असे आहेत की ज्या ठिकाणी मुस्लिम हे स्वत: निवडून येऊ शकत नसले तरी ते इतरांना जरूर पाडू शकतात. अशाप्रकारे १७४ लोकसभा मतदारसंघांवर मुस्लिम निर्णायकपणे प्रभाव पाडू शकतात. हे संसदीय राजकारणाचे वास्तव आहे. म्हणून ज्या राजकीय पक्षाला या देशावर सत्ता गाजवायची आहे त्यांना मुस्लिमांचा विचार करणे अपरिहार्य आहे.

पण हा विचार केवळ संसदीय राजकारणापुरता केला जाऊ नये. मुस्लिम मानसप्रतिमा एकात्म नाही, तीही इतरांसारखीच जात/प्रदेश/भाषा/वंश इत्यादींमध्ये विखुरलेली आहे. हे वास्तव लक्षात घेऊन संसदीय राजकारणासोबत लोकशाही प्रक्रियेमध्ये त्यांना सामावून घ्यावे लागेल. त्यासाठी दोन्ही धर्मांतील जात-जमातवादी आणि धर्मांध शक्तींना जनतेपासून अलग पाडावे लागेल. त्याचबरोबर जनतेचा डावा लोकशाही खराखुरा पर्याय जो संघर्षावर आधारित असेल तो उभारावा लागेल. सर्वं जाती-धर्मांतील श्रमिक जनतेची भक्कम एकजूट बांधावी लागेल. ही एकजूट केवळ संसदीय राजकारणापुरती मर्यादित राहून चालणार नाही, तर जीवनाच्या सर्व क्षेत्रांत निर्माण करावी लागेल. त्यामध्ये केवळ मुस्लिमांचेच नव्हे तर सर्वसामान्य भारतीयांचेही हित आहे. हे जेवढे लवकर आपल्या ध्यानात येईल तेवढ्या लवकर आपला विकास होईल यात काहीच शंका नाही.

◘ ◘ ◘